महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र.०२० २५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

## परिपत्रक :-

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२२/ 1666
दिनांक : ०७/०४/२०२२ 07 APR 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यवहार करतेवेळी पत्रामध्ये संस्था कोड (Dte Code) नमुद करणे व कार्यालयात येते वेळी ओळखपत्र सोबत बाळगणे बाबत..**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कामामध्ये व पत्रव्यवहारमध्ये सुस्पष्टता निर्माण व्हावी, संस्थेच्या एक सारख्या नावामुळे गोंधळ निर्माण होऊ नये, इत्यादी कामकाजाकरीता संचालनालयाकडून संस्था कोड (Dte Code) निर्गमित करण्यात आलेला आहे. परंतु संस्थास्तरावरुन या कार्यालयास किंवा वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यवहार करतेवेळी पत्रामध्ये संस्था कोड (Dte Code) नमुद करण्यात येत नाही व संस्थेचा प्रतिनिधी या कार्यालयास येते वेळी त्याकडे संस्थेचे ओळखपत्र दिसुन येत नाही. त्यामुळे संस्थेस व वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यवहार करतेवेळी अडचणी निर्माण होतात.

- या कार्यालयास किंवा वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यपहार करतेवेळी आपल्या पत्रामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात यावे.

१. संस्था कोड (Dte Code) नमुद करणे
२. संस्थेचा ई-मेल आयडी व संपर्क क्र अद्ययावत करावे.

- या कार्यालयास किंवा वरिष्ठ कार्यालयास संस्थेचा प्रतिनिधी येते वेळी खालील प्रमाणे बदल करण्यात यावे.

१. संस्थेचा प्रतिनिधी या कार्यालयाच्या कामाकाजाकरीता येते वेळी संबंधित कामकाजाकरीताचे प्रतिनियुक्ती आदेश आवश्यक आहे.
२. संस्थेच्या प्रतिनिधीकडे संबंधित संस्थेचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. (प्ररिधान करणे)

- बऱ्याचदा संस्था, डीबीटी/संस्थाबदल इत्यादी संबंधी कामासाठी विदयार्थ्यांना या कार्यालयाकडे पाठवतात हे उचित नाही. विदयार्थ्यांच्या समस्या संस्था स्तरावर सोडवण्यात याव्यात. जर त्यातूनही काही समस्येसाठी या विभागीय कार्यालयाकडे येणे आवश्यक असल्यास संस्थेच्या प्रतिनिधीने स्वतः उपस्थित रहावे. विदयार्थ्यांना परस्पर या कार्यालयात पाठवू नये.

(श्री मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता